३३

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०१/०९/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- ३०२३/ प्र. क्र. ११३/कीयुसे-१, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** दहीहंडी उत्सव व प्रो-गोविंदा लीग दरम्यान मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोविंदाना विमा संरक्षण देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण- ३०२३/ प्र. क्र.११३/ कीयुसे-१, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३०८२९१८५७१८१५२१ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**दहीहंडी उत्सव व प्रो-गोविंदा लीग स्पर्धेत मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त होणाऱ्या गोविंदांना विमा संरक्षण देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण ३०२३/प्र.क्र.११३/कीयुसे-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ ऑगस्ट, २०२३

वाचा:-

समक्रमाकांचा शासन निर्णय दि.१८ ऑगस्ट, २०२३

प्रस्तावना:-

सन २०२३ मधील दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोविंदाचा विमा उतरवणे व प्रो- गोविंदा लीग स्पर्धेचे आयोजन करणेबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५ जुलै २०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयानुसार संदर्भाधीन दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ च्या शासन निर्णयान्वये सन २०२३ मधील दहीहंडी उत्सवामध्ये तसेच प्रो- गोविंदा लीग स्पर्धेत सहभागी होणाऱ्या एकूण ५०,००० गोविंदाना विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान यासंदर्भात अतिरिक्त २५००० गोविंदांना विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी होत आहे. यानुषंगाने सराव व प्रशिक्षण असलेल्या तसेच प्रत्यक्षात भाग घेणाऱ्या अतिरिक्त २५००० गोविंदांना विमासंरक्षण देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

दहिहंडी उत्सव / प्रो-गोविंदा लीग मधील सहभागी गोविंदांना मानवी मनोरे रचताना अपघात/दुर्घटना होण्याची शक्यता असते. त्यातूनच काही गोविंदांना अपघात होऊन, गोविंदांचा दुर्दैवी मृत्यू घडून येण्याची किंवा त्यांना गंभीर दुखापत होण्याची शक्यता निर्माण होते. यासाठी संदर्भाधिन शासन निर्णय, दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ अन्वये विमा संरक्षण उपलब्ध करुन दिलेल्या ५०,००० गोविंदांव्यतिरिक्त अधिकच्या २५,००० गोविंदांना विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्याकरीता ओरिएन्टल इन्शुरन्स विमा कंपनीला प्रति गोविंदा रु. ७५/- विमा हप्ता याप्रमाणे एकूण रु.१८,७५,०००/- (अक्षरी रुपये अठरा लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) इतका निधी अदा करण्यासाठी दहिहंडी समन्वय समिती (महा.) या संस्थेस वितरित करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत विमा संरक्षणाचे स्वरुप हे संदर्भाधिन दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार व संबंधीत विमा कंपनीच्या अटी/शर्तीनुसार राहील.

**३.** संदर्भाधिन शासन निर्णय दि.१८.८.२०२३ मधील तरतुदी तसेच अटी व शर्ती कायम राहतील.

**४.** विमा संरक्षणाचा कालावधी हा सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून ते दिनांक ८ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील.

**५.** यावरील खर्च राज्य क्रीडा विकास निधीतून भागविण्यात येईल.

**६.** वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम / निधी "दहिहंडी समन्वय समिती (महा.)" या संस्थेस प्रदान करण्यात यावी. यासंदर्भात शिल्लक राहिलेला निधी शासनास तात्काळ परत करण्यात यावा.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३०८२९१८५७१८१५२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RANSING ANANDRAO DERE

Digitally signed by RANSING ANANDRAO DERE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=9651a3c25d5e1f106e47059f72760ff520f9b00f67c3e9186e40ed4bd4fbaee6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=41EC78BC14804BABDC24C7FD31BA9FBF63804F499D4335774E27423E40136397, cn=RANSING ANANDRAO DERE
Date: 2023.08.30 11:48:54 +05'30'

**( रणसिंग डेरे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
५. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधानपरिषद)
७. सर्व सन्मा. विधान परिषद /विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहायक
९. अपर मुख्य सचिव, वित्त /गृह /सार्वजनिक आरोग्य यांचे स्वीय सहायक
१०. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक.
११.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, यांचे स्वीय सहायक
१२.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परिक्षा)-१ /२ महाराष्ट्र, मुंबई /नागपूर
१४.सर्व विभागीय आयुक्त,
१५.सर्व जिल्हाधिकारी,

१६.सर्व पोलिस आयुक्त / पोलिस अधिक्षक
१७.आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०.सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायती,
२१.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
२२.सर्व अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय/दंत विद्यालये व रुग्णालये,
२३.सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे,
२४.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,
२५.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, क्रीडा व युवक सेवा,
२६.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
२७.सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये,
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३१.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी मंत्रालय, मुंबई
३२.व्यवस्थापक, ओरिएंटल इन्श्युरन्स कंपनी, ओरिएंटल हाऊस, चर्चगेट, मुंबई-४०००२०.
३३.अध्यक्ष/सचिव, दहिहंडी समन्वय समिती (महा.), मुंबई (रजि.क्र.एफ-७२१८१)
३४. निवड नस्ती (क्रीयुसे-१)